सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

## सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४०

# मुंबई शहर दिवाणी न्यायालय अधिनियम, १९४८

( दिनांक ३१ जुलै, २०१५ पर्यंत सुधारित )

## Bombay Act No. XL of 1948

# The Bombay City Civil Court Act, 1948

*( As modified upto 31st July, 2015 )*

*

व्यवस्थापक , शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, कोल्हापूर यांच्याकडून भारतात मुद्रित आणि
संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ००४ यांच्याकडून प्रकाशित

२०१५

[ किंमत रु. ९.००]

# मुंबई शहर दिवाणी न्यायालय अधिनियम, १९४८

---------------

## अनुक्रमणिका

**उद्देशिका.**


| **कलमे.** | | **पृष्ठ** |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव, व प्रारंभ. .. .. .. | १ |
| २. | व्याख्या. .. .. .. | २ |
| ३. | शहर न्यायालयाची रचना. .. .. .. | २ |
| ४. | ( वगळण्यात आले. ) .. .. .. | २ |
| ४-अ. | कलम ३ अन्वये दखल घेण्याजोगे असलेले दावे व प्रकरणे शहर न्यायालयाकडे.. वर्ग करणे. | ३ |
| ४-ब. | नियम करण्याचा अधिकार. .. .. .. | ३ |
| ५. | उच्च न्यायालयास अधीन असणे आणि उच्च न्यायालयाकडून अधीक्षण. .. | ३ |
| ६. | न्यायाधीशांची नेमणूक. .. .. .. | ३ |
| ७. | शहर न्यायालय एकापेक्षा अधिक न्यायाधीशांचे मिळून बनलेले असेल तेव्हा, न्यायाधीशांचे अधिकार. .. | ४ |
| ८. | प्रबंधक व अपर प्रबंधक. .. .. .. | ४ |
| ९. | या अधिनियमान्वये दाखल केलेले दावे, वगैरे यांत उद्‌भवणाऱ्या प्रश्नांचा निर्णय उच्च न्यायालयाकडून ज्या कायद्यास अनुसरुन करण्यात येत असेल त्या कायद्यास अनुसरुन करणे. .. | ५ |
| १०. | आदेशिकांबद्दल फी. .. .. .. | ५ |
| ११. | ( वगळण्यात आले. ) .. .. .. | ५ |
| १२. | विवक्षित प्रकरणाखेरीज इतर प्रकरणात उच्च न्यायालयाच्या अधिकारितेस प्रतिबंध. | ५ |
| १३. | ( वगळण्यात आले. ) .. .. .. | ६ |
| १४. | शहर न्यायालयांकडून उच्च न्यायालयाकडे आणलेल्या प्रकरणांच्या बाबतीत शहर न्यायालयात भरलेली फी जमेस धरणे. | ६ |
| १५. | अपिले व मुदतमर्यादा. .. .. .. | ६ |
| १६. | शहर न्यायालयाची मुद्रा. .. .. .. | ६ |
| १७. | सुट्ट्या व दीर्घ मुदतीची सुट्टी. .. .. .. | ६ |
| १८. | उच्च न्यायालयात प्रलंबित असलेले दावे पाठविणे. .. .. .. | ७ |


---------------

## सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४०[1]

# मुंबई शहर दिवाणी न्यायालय अधिनियम, १९४८

**[ १० मे, १९४८ ]**

[ दिनांक ३ मे, १९४८ रोजी राज्यपाल यांची अनुमती मिळाल्यावर दिनांक १० मे, १९४८ रोजी मुंबई सरकारचे राजपत्र, यात प्रथम (इंग्रजीत) प्रसिध्द केलेला. ]

या अधिनियमात पुढील आदेश व अधिनियम याअन्वये अनुकूलन, रूपभेद व सुधारणा करण्यात आल्या आहेत :--

सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक २६.
विधि अनुकूलन आदेश, १९५०.
सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ९.
सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३२.
सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५.
सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९.
सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६. (१-१-१९७८)*†
सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५. (१-७-१९७९)*
सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ @ (१-५-१९९२)*
सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ (१-९-२०१२) (१-१०-२०१२)**$

**बृहन्मुंबईसाठी जादा दिवाणी न्यायालय स्थापन करण्याबाबत अधिनियम.**

**ज्याअर्थी,** बृहन्मुंबईसाठी जादा दिवाणी न्यायालय स्थापन करणे इष्ट आहे. **त्याअर्थी,** याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :--

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, मुंबई शहर दिवाणी न्यायालय अधिनियम, १९४८ असे म्हणावे.

---

१. उद्देश व कारणे यांचे निवेदन यासाठी **मुंबई शासन राजपत्र,** १९४८, भाग पाच, पृष्ठ ७ पहा.

*. ही खूण अधिनियमांच्या प्रारंभाची तारीख दर्शविते.

† सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६, कलम १९ पुढीलप्रमाणे आहे :--

व्यावृत्ती.

"१९. पूर्वोक्त अधिनियमांपैकी कोणत्याही अधिनियमात या अधिनियमाद्वारे केलेल्या सुधारणांचा या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेस कोणत्याही न्यायालयात दाखल केलेल्या व त्यांच्याकडे प्रलंबित असलेल्या दिवाणी स्वरुपाच्या कोणत्याही वादांच्या, अपिलांच्या किंवा इतर कार्यवाहीच्या बाबतीत परिणाम होणार नाही व त्याबाबतीत त्या लागू असणार नाहीत व अशी कार्यवाही जणू काही हा अधिनियम परिसंमत करण्यात आलेला नसल्याप्रमाणे त्या न्यायालयाकडून चालू ठेवण्यात येईल व निकालात काढण्यात येईल ; तसेच या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेपूर्वी कोणत्याही न्यायालयाने काढलेल्या कोणत्याही हुकुमनाम्याच्या किंवा दिलेल्या आदेशाच्या बाबतीतील दिवाणी स्वरुपाचे कोणतेही अपील, पुनरीक्षण अर्ज किंवा इतर कार्यवाही जणू काही हा अधिनियम परिसंमत करण्यात आलेला नसल्याप्रमाणे अशा प्रारंभापूर्वी अशी कार्यवाही करण्यास सक्षम असणाऱ्या न्यायालयापुढे दाखल करण्यात येईल व तिची सुनावणी करण्यात येईल व ती निकालात काढण्यात येईल."

@ हा अधिनियम, शा. नि., विधि व न्याय विभाग, क्रमांक सीसीएस-२९९०/६२(१२) (दहा), दिनांक २० ऑगस्ट, १९९१ याद्वारे अंमलात आला.

**. कलमे १,२,३,५,६ व ७, १ सप्टेंबर, २०१२ रोजी अंमलात आली आणि कलम ४, १ ऑक्टोबर, २०१२ रोजी अंमलात आले. पहा - शा. नि., विधि व न्याय विभाग, क्रमांक सी.सी.एस. २९९१/सी.आर-५८/डी-१९, दिनांक २८ ऑगस्ट २०१२.

$ सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ चे कलम ६ खालीलप्रमाणे वाचावे :--

२०१२ महा. २५. — संक्रमणकालीन तरतुदी.

"६. मुंबई शहर दिवाणी न्यायालय (सुधारणा) अधिनियम, २०१२ याचे कलम ४ अंमलात आल्याच्या दिनांकानंतर कलम ४अ च्या पोट-कलम (१) अन्वये शहर न्यायालयाकडे वर्ग करण्यायोग्य असलेले सर्व दावे व प्रकरणे, पक्षकारांवर नवीन नोटीस न बजावता, उच्च न्यायालय अशा प्रकरणांची सूची आपल्या सूचनाफलकावर लावील आणि संबंधित प्रकरण शहर न्यायालयापुढे ज्या दिवशी येईल तो दिनांक त्यात अधिसूचित करील."

(२) तो, [१][राज्य] शासन, **राजपत्रात** प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेद्वारे याबाबत जो [२]दिनांक नेमील त्या दिनांकास अंमलात येईल.

**२.** विषयात किंवा संदर्भात याविरूध्द काही नसल्यास, या अधिनियमात -- व्याख्या.

(१) "शहर न्यायालय" याचा अर्थ, कलम ३ अन्वये स्थापन केलेले न्यायालय, असा आहे ;

(२) "उच्च न्यायालय" याचा अर्थ, मुंबई येथील उच्च न्यायालय, असा आहे ;

(३) "दावा दाखल करण्याबद्दलची फी" याचा अर्थ, ज्या वादपत्राद्वारे किंवा अर्जाद्वारे दावा किंवा कार्यवाही दाखल करण्यात आलेली असेल त्या वादपत्राच्या किंवा अर्जाच्या संबंधात द्यावयाची न्यायालय फी, असा आहे ;

[३][ (३अ) "बौध्दिक मालमत्ताविषयक बाबी" याचा अर्थ, व्यापारचिन्हे, प्रकाशनाधिकार (कॉपीराइट), एकस्व (पेटंट), संकल्पचित्र व भौगोलिक निर्देश, वनस्पतींच्या प्रजाती आणि शेतकरी व वनस्पती लागवडदारांचे हक्क आणि संकलक परिपथ रेखांकन (रचनाकृती) यांच्याशी संबंधित दावे व दिवाणी प्रकरणे, असा आहे ; ]

(४) "लघुवाद न्यायालय" याचा अर्थ, मुंबईचे लघुवाद न्यायालय, असा आहे ;

(५) "विशेष कायदा" याचा अर्थ, विशिष्ट विषयास लागू असलेला कायदा, असा आहे.

शहर न्यायालयाची रचना. **३.** [१][राज्य] शासनास **राजपत्रात** प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेद्वारे, बृहन्मुंबईसाठी मुंबई शहर दिवाणी न्यायालय या नावाचे एक न्यायालय स्थापन करता येईल. कोणत्याही कायद्यात, काहीही अंतर्भूत असले तरी, अशा न्यायालयास [४][एक कोटी रुपयांहून अधिक नसतील अशा मूल्याचे] [५][ * * * ] बृहन्मुंबईत उद्‌भवणारे दिवाणी स्वरुपाचे सर्व दावे व इतर कार्यवाही स्वीकारण्याची, त्यांची न्यायचौकशी करण्याची व ते निकालात काढण्याची अधिकारिता असेल :

परंतु, (अ) ॲडमिरॅलिटी न्यायालय किंवा व्हाईस ॲडमिरॅलिटी न्यायालय म्हणून किंवा कलोनियल ॲडमिरॅलिटी न्यायालय म्हणून किंवा मृत्यूपत्रविषयक, अकृतमृत्यूपत्राविषयक किंवा विवाहविषयक अधिकारिता असलेले न्यायालय म्हणून उच्च न्यायालयास, किंवा

(ब) नादार ऋणकोंच्या ऋणनिवारणासाठी उच्च न्यायालयास, किंवा

(क) लेटर्स पेटंटव्यतिरिक्त इतर कोणत्याही विशेष कायद्यान्वये उच्च न्यायालयास, किंवा

[६][ (क-१) पारसी विवाह व घटस्फोट अधिनियम, १९३६ अन्वये उच्च न्यायालयास किंवा १९३६ चा ३.
(क-२) बौध्दिक मालमत्ताविषयक बाबीसंदर्भात उच्च न्यायालयास ; किंवा ]

(ड) लघुवाद न्यायालयास,

[७][परंतु, राज्य शासनास, वेळोवेळी, उच्च न्यायालयाशी विचारविनिमय करुन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, शहर न्यायालयाच्या द्रव्यविषयक अधिकारितेत वाढ करता येईल. आणि उच्च न्यायालयाच्या द्रव्यविषयक अधिकारितेत तद्‌नुरुप फेरफार करता येईल.]

---

१. विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "प्रांतिक" या शब्दाऐवजी "राज्य" हा शब्द दाखल केला.

२. १६ ऑगस्ट, १९४८ [पहा-शासकीय अधिसूचना, गृह विभाग क्रमांक २३४६/५-(७), दिनांक १४ ऑगस्ट, १९४८].

३. सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम २ द्वारे खंड (३अ) दाखल करण्यात आला.

४. वरील अधिनियमाच्या कलम ३(अ) द्वारे हा मजकूर दाखल करण्यात आला.

५. १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम २ द्वारे "पन्नास हजार रुपयांहून अधिक नाही अशा किंमतीचे व" हा मजकूर वगळला.

६. सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ३(ब) द्वारे खंड (क-१) व (क-२) दाखल करण्यात आले.

७. वरील अधिनियमाच्या कलम ३(क) द्वारे विद्यमान परंतुकाऐवजी हे परंतुक दाखल करण्यात आले.

**४.** [शहर न्यायालयाची अधिकारिता वाढविण्याचा [1][राज्य] शासनाचा अधिकार.] (सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४६ याच्या कलम ३ द्वारे वगळण्यात आले.)

१९८७ चा महा. १५. [2][**४अ.** [3][(१) मुंबई शहर दिवाणी न्यायालय व मुंबई लघुवाद न्यायालय (द्रव्यविषयक अधिकारिता वाढविणे व सुधारणा) अधिनियम, १९८६ याच्या कलम ९ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कलम ३ च्या खंड (अ) ते (ड) खाली येणारे दावे किंवा प्रकरणे वगळता कलम ३ अन्वये शहर न्यायालयाने दखल घेण्याजोगे असलेले आणि मुंबई शहर दिवाणी न्यायालय (सुधारणा) अधिनियम, २०१२ याचे कलम ४ अंमलात येण्याच्या दिनांकास उच्च न्यायालयात प्रलंबित असलेले सर्व दावे व प्रकरणे, शहर न्यायालयाकडे वर्ग होतील.] २०१२ चा महा. २५. [4][कलम ३ अन्वये दखल घेण्याजोगे असलेले दावे व प्रकरणे शहर न्यायालयाकडे वर्ग करणे.]

(२) अशा रीतीने पाठविण्यात आलेल्या कोणत्याही दाव्याची किंवा कार्यवाहीची सुनावणी व ती निकालात काढण्याचे काम शहर न्यायालयाने केले पाहिजे आणि शहर न्यायालयास जणू असा दावा किंवा कार्यवाही त्या न्यायालयात प्रारंभत: दाखल करण्यात आली होती, असे समजून त्यासंबंधी सर्व अधिकार व अधिकारिता असतील.

(३) अशा कोणत्याही दाव्यात किंवा कार्यवाहीत दावा दाखल करण्याबद्दलची फी भरली पाहिजे ; परंतु, उच्च न्यायालयाने वसूल केलेली कोणतीही न्यायालय फी जमेस धरण्यात येईल ; आणि दावा किंवा कार्यवाही पाठविण्याच्या दिनांकापर्यंत उच्च न्यायालयात झालेल्या खर्चाची आकारणी [5][राज्य] शासन उच्च न्यायालयाशी विचारविनिमय करुन नियमांद्वारे ठरवील त्या रीतीने शहर न्यायालयाने केली पाहिजे.]

[6][**४ब.** उच्च न्यायालयास **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील.] नियम करण्याचा अधिकार.

१९०८ चा ५. **५.** शहर न्यायालय हे उच्च न्यायालयाचे लेटर्स पेटंट व दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ यांच्या अर्थानुसार उच्च न्यायालयास अधीन आहे व त्याच्या अधीक्षणाखाली आहे, असे समजले पाहिजे. उच्च न्याया-लयास अधीन असणे आणि उच्च न्याया-लयाकडून अधीक्षण.

**६.** [5][राज्य] शासनास, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेद्वारे, त्यास योग्य वाटतील इतक्या व्यक्तींची शहर न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून नेमणूक करता येईल. न्यायाधीशांची नेमणूक.

---

१. विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "प्रांतिक" या शब्दाऐवजी "राज्य" हा शब्द दाखल केला.

२. सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक २६ याच्या कलम ३ द्वारे पोट कलम ४अ हे समाविष्ट केले.

३. सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ याच्या कलम ४(अ) द्वारे पोट-कलम (१) दाखल करण्यात आले.

४. वरील अधिनियमाच्या कलम ४ (ब) द्वारे मूळ समास टिपेऐवजी ही समास टीप दाखल करण्यात आली.

५. सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ९ याच्या कलम ३, दुसरी अनुसूची याद्वारे "प्रांतिक" या शब्दाऐवजी "राज्य" हा शब्द, दाखल केला.

६. सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ यांच्या कलम ५ द्वारे पोट कलम ४ब दाखल करण्यात आले.

शहर न्यायालय एकापेक्षा अधिक न्यायाधीशांचे मिळून बनलेले असेल तेव्हा न्यायाधीशांचे अधिकार.

**७.** जेव्हा शहर न्यायालय एकापेक्षा अधिक न्यायाधीशांचे मिळून बनलेले असेल तेव्हा,--

(अ) त्यापैकी प्रत्येक न्यायाधीशास, या अधिनियमान्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्यान्वये न्यायालयास दिलेले सर्व किंवा कोणतेही अधिकार वापरता येतील.

(ब) [१][राज्य] शासनास, त्यापैकी कोणत्याही एका न्यायाधीशाची प्रमुख न्यायाधीश म्हणून [२][आणि कोणत्याही अन्य दोन न्यायाधीशांची अपर प्रमुख न्यायाधीश म्हणून] नेमणूक करता येईल.

(क) मुख्य न्यायाधीशास, न्यायालयाचे काम न्यायालयाच्या निरनिराळ्या न्यायाधीशांस वाटून देण्यासाठी, त्यास योग्य वाटेल अशी व्यवस्था वेळोवेळी करता येईल.

[३][(ड) [४][कोणत्याही अपर प्रमुख न्यायाधीशास], उच्च न्यायालय वेळोवेळी निदेश देईल त्याप्रमाणे, हा अधिनियम किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेला कोणताही इतर कायदा याअन्वये मुख्य न्यायाधीशास देण्यात आलेल्या सर्व किंवा कोणत्याही अधिकारांचा वापर करता येईल.]

[१०][प्रबंधक व अपर प्रबंधक.]

**८.** (१) [१][राज्य] शासनास, शहर न्यायालयाचा प्रबंधक म्हणून एक अधिकारी नेमता येईल. तो अशा न्यायालयाचा मुख्य प्रशासी अधिकारी असेल, आणि त्याने शहर न्यायालयाचा न्यायाधीश वेळोवेळी नियम करुन निदेश देईल असे प्रशासी स्वरुपाचे अधिकार चालविले पाहिजेत व अशा स्वरुपाची कर्तव्ये बजाविली पाहिजेत. [५][राज्य शासनास [६][अपर प्रबंधक, शहर दिवाणी न्यायालय या नावाने संबोधण्यात येणारे दोन अधिकारीसुद्धा] नेमता येतील. [७][कोणत्याही अपर प्रबंधकाने] मुख्य न्यायाधीश नियमाद्वारे वेळोवेळी निदेश देईल त्याप्रमाणे प्रबंधकाच्या सर्व किंवा कोणत्याही अधिकाराचा वापर केला पाहिजे व प्रबंधकाची सर्व किंवा कोणतीही कर्तव्ये बजावली पाहिजेत.]

(२) [१][राज्य] शासनास, उच्च न्यायालयाची पूर्वमान्यता घेऊन, [८][शहर न्यायालयाच्या न्यायाधीशांचे पुढील सर्व किंवा कोणतेही अधिकार प्रबंधकास आणि [९][कोणत्याही अपर प्रबंधकास] देता येतील, ते अधिकार असे :--

(अ) नादार म्हणून दावा दाखल करण्यासाठीच्या किंवा बचाव करण्याच्या परवानगी दाखलच्या किंवा नादार म्हणून दावा दाखल करण्यासाठी किंवा बचाव करण्यासाठी परवानगी मिळालेल्या वादीस किंवा प्रतिवादीस नादार नाही म्हणून ठरविण्याबद्दलच्या सर्व अर्जाची सुनावणी करण्याचा व ते निकालात काढण्याचा अधिकार ;

---

१. विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "प्रांतिक" या शब्दाऐवजी "राज्य" हा शब्द दाखल केला.

२. सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम २ (क) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

३. सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम २ (ब) द्वारे खंड (ड) समाविष्ट केला.

४. सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम २ (ब) द्वारे मूळ मजकूराऐवजी हा मजकूर दाखल केला.

५. सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ३ (अ) द्वारे हा मजकूर जादा दाखल केला.

६. सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम ३ (अ) (एक) द्वारे मूळ मजकूराऐवजी हा मजकूर दाखल केला.

७. वरील अधिनियमाच्या कलम ३(अ) (दोन) द्वारे मूळ मजकूराऐवजी हा मजकूर दाखल केला.

८. सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम २ द्वारे मूळ मजकूराऐवजी हा मजकूर दाखल केला.

९. सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम ३ (ब) द्वारे मूळ मजकूराऐवजी हा मजकूर दाखल केला.

१०. सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ याच्या कलम ३ (क) द्वारे "प्रबंधक" या समास टीपेऐवजी ही समास टीप दाखल केली.

(ब) सर्व वादकालीन अर्जाची किंवा कोणताही दावा किंवा इतर काम पुढे चालू राहण्यासाठी आवश्यक असलेल्या बाबींची सुनावणी करण्याचा व त्या निकालात काढण्याचा अधिकार ;

(क) हुकूमनाम्याच्या बजावणीसाठीच्या सर्व अर्जांची (परंतु, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ याच्या प्रथम अनुसूचीतील नियमावली एकवीस यातील नियम २२ मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या अर्जाच्या बाबतीत, त्याअन्वयेची नोटीस जिच्यावर बजावण्यात आली असेल ती व्यक्ती उपस्थित झाली नसेल किंवा बजावणीसंबंधी तिने कोणतीही हरकत घेतली असेल अशाच बाबतीत केवळ) सुनावणी करणे व ते निकालात काढणे ; १९०८ चा ५.

(ड) दाव्याची किंवा कार्यवाह्यांची न्यायचौकशी करण्याचे अधिकार नसतील असे, उक्त न्यायाधिशांचे इतर अधिकार.]

या अधिनियमान्वये दाखल केलेले दावे, वगैरे यात उद्‌भवणाऱ्या प्रश्नांचा निर्णय उच्च न्यायालयाकडून ज्या ज्या कायद्यास अनुसरुन करण्यात येत असेल त्या कायद्यास अनुसरुन करणे.

**९.** या अधिनियमात अन्यथा जी तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, शहर न्यायालयात या अधिनियमान्वये दाखल केलेल्या दाव्यात किंवा इतर कार्यवाहीत उद्‌भवणाऱ्या सर्व प्रश्नांचा निर्णय, उच्च न्यायालय आपली सामान्य प्रारंभिक दिवाणी अधिकारिता चालवीत असता, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या ज्या कायद्यास अनुसरुन, न्यायदान करते त्या कायद्यास अनुसरुन करण्यात आला पाहिजे.

आदेशिकांबद्दल फी.

**१०.** (१) उच्च न्यायालयाने, वेळोवेळी, [1][राज्य] शासनाची मंजुरी घेऊन, शहर न्यायालयाने किंवा अशा न्यायालयाच्या कोणत्याही अधिकाऱ्याने काढलेल्या कोणत्याही आदेशिकेबद्दल घ्यावयाची फी विहित केली पाहिजे व ती घेण्याबाबत नियमन केले पाहिजे.

(२) अशा रितीने विहित केलेल्या फीचा तक्ता **राजपत्रात** प्रसिद्ध केला पाहिजे.

**११.** [दावा दाखल करण्याबद्दलची फी विवक्षित परिस्थितीत परत करणे.] (सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम १५ याच्या कलम ३ द्वारे वगळण्यात आले.)

विवक्षित प्रकरणांखेरीज इतर प्रकरणांत उच्च न्यायालयाच्या अधिकारितेस प्रतिबंध.

**१२.** कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, ज्या दाव्यांची व कार्यवाहींची दखल घेण्याचा शहर न्यायालयास अधिकार आहे त्या दाव्यांची न्यायचौकशी करण्याची उच्च न्यायालयास अधिकारिता असणार नाही :

परंतु, उच्च न्यायालयास, कोणत्याही विशेष कारणांसाठी, शहर न्यायालयापुढे चालू असलेल्या कोणत्याही दाव्याचा किंवा कार्यवाहीचा स्वत: न्यायनिर्णय करण्यासाठी ते कोणत्याही टप्प्यावर शहर न्यायालयाकडून काढून आपल्याकडे घेता येईल.

**१३.** [वादीने शहर न्यायालयाऐवजी उच्च न्यायालयात दावा दाखल केल्यास खर्च नामंजूर करणे.] (सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ याच्या कलम ३ द्वारे वगळले)

---

१. विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "प्रांतिक" या शब्दाऐवजी "राज्य" हा शब्द दाखल केला.

शहर न्याया-लयाकडून उच्च न्यायालयाकडे आणलेल्या प्रकरणांच्या बाबतीत शहर न्यायालयात भरलेली फी जमेस धरणे.

**१४.** जेव्हा कलम १२ अन्वये कोणताही दावा किंवा कार्यवाही शहर न्यायालयाकडून काढून घेऊन उच्च न्यायालयाकडे न्यायचौकशीसाठी आणण्यात येईल तेव्हा, --

(अ) त्याची सुनावणी व ती निकालात काढण्याचे काम उच्च न्यायालयाने आपली प्रारंभिक दिवाणी अधिकारिता चालवून केली पाहिजे, आणि उक्त न्यायालयास, जणू असा दावा किंवा कार्यवाही अशा न्यायालयात प्रारंभत: दाखल करण्यात आली होती असे समजून, त्यासंबंधी सर्व अधिकार व अधिकारिता असतील ;

(ब) प्रारंभिक दिवाणी अधिकारिता असलेले न्यायालय म्हणून उच्च न्यायालयात न्यायालय फीचे जे प्रमाण त्या त्या वेळी अंमलात असेल त्या प्रमाणास अनुसरुन, त्यातील दाव्याच्या किंवा कार्यवाहीच्या संबंधात द्यावयाची न्यायलय फी त्या न्यायालयात भरली पहिजे :

परंतु, अशी जी कोणतीही फी न्यायालयाच्या प्रथेनुसार [१][राज्य] शासनाकडे जमा केली जाते ती वसूल करताना, शहर न्यायालयात दावा दाखल करण्याबद्दल जी फी आधीच भरण्यात आली असेल ती जमेस धरण्यात आली पाहिजे.

अपिले व मुदत-मर्यादा.

**१५.** (१) पुढील हुकूमनाम्यांवर व आदेशावर उच्च न्यायालयाकडे अपील करता येईल --

(अ) शहर न्यायालयाच्या न्यायाधीशाने दिलेला प्रत्येक हुकूमनामा, आणि

(ब) दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, कलम १०४ यात विनिर्दिष्ट केलेले आणि उक्त कलमात तरतूद केलेल्या मर्यादेपर्यंत उक्त न्यायाधीशांनी दिलेले आदेश. १९०८ चा ५.

(२) शहर न्यायालयाच्या हुकूमनाम्यावर किंवा आदेशावर करावयाच्या अपिलांची मुदतमर्यादा अशा हुकूमनाम्याच्या किंवा आदेशाच्या दिनांकापासून तीस दिवस इतकी असेल :

[१][परंतु, अपिलकर्त्यास, पुरेशा कारणामुळे उक्त तीस दिवसांच्या मुदतीत अपील करण्यास प्रतिबंध झाला अशी उच्च न्यायालयाची खात्री झाल्यास, उच्च न्यायालयास, उक्त मुदत संपल्यानंतरही अपील दाखल करून घेता येईल.]

शहर न्याया-लयाची मुद्रा.

**१६.** शहर न्यायालयाने [२][राज्य] शासन त्या त्या वेळी विहित करील अशा नमुन्याप्रमाणे व अशा लांबीरूंदीची मुद्रा वापरली पाहिजे.

सुट्ट्या व दीर्घ मुदतीच्या सुट्ट्या.

**१७.** (१) शहर न्यायालयाच्या न्यायाधीशाने आणि जेव्हा असे न्यायालय एकापेक्षा अधिक न्यायाधीशांचे मिळून बनलेले असेल तेव्हा, मुख्य न्यायाधीशाने, प्रत्येक वर्षाच्या सुरवातीस, अशा न्यायालयाने घ्यावयाच्या सुट्ट्यांची व दीर्घ मुदतीच्या सुट्ट्यांची यादी तयार केली पाहिजे व ती उच्च न्यायालयाकडे मान्यतेसाठी सादर केली पाहिजे.

(२) अशा यादीस मान्यता मिळाल्यानंतर, ती यादी **राजपत्रात** प्रसिद्ध केली पाहिजे आणि त्याप्रमाणे अशा सुट्ट्या व दीर्घ मुदतीच्या सुट्ट्या देण्यात येतील.

---

१. सन १९५४ चा मुंबई अधिनियम ३२ याच्या कलम ३ द्वारे हे परंतुक दाखल केले.
२. विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "प्रांतिक" या शब्दाऐवजी "राज्य" हा शब्द दाखल केला.

**१८.** (१) शहर न्यायालयाने दखल घेण्याजोग्या व उच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या ज्या दाव्यांत व कार्यवाहीत, हा अधिनियम अंमलात येण्याच्या दिनांकास किंवा त्यापूर्वी वादविषयी ठरविण्यात आले नाहीत किंवा साक्षीपुरावा नमूद करण्यात आला नाही असे सर्व दावे किंवा कार्यवाही, शहर न्यायालयाकडे पाठविण्यात आल्या पाहिजेत ; आणि शहर न्यायालयाने त्यांची सुनावणी करुन त्या निकालात काढल्या पाहिजेत. शहर न्यायालयास, जणू काही असे दावे किंवा कार्यवाही त्या न्यायालयात प्रारंभत: दाखल करण्यात आल्या होत्या असे समजून, त्यासंबंधी सर्व अधिकार व अधिकारिता असतील. उच्च न्यायालयात प्रलंबित असलेले दावे पाठविणे.

(२) अशा रीतीने पाठविलेल्या कोणत्याही दाव्यात किंवा कार्यवाहीत, दावा दाखल करण्याबद्दलची फी भरली पाहिजे. उच्च न्यायालयाने वसूल केलेली कोणतीही न्यायालय फी जमेस धरण्यात येईल ; आणि दावा किंवा कार्यवाही पाठविण्याच्या दिनांकापर्यंत, उच्च न्यायालयात झालेल्या खर्चाची आकारणी [१][राज्य] शासन उच्च न्यायालयाशी विचारविनिमय करुन नियमांनी ठरवील त्या रीतीने शहर न्यायालयाने केली पाहिजे.

---

१. विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "प्रांतिक" या शब्दाऐवजी "राज्य" हा शब्द दाखल केला.

एच ४२०-४,६२७-८-२०१५
शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर

## महाराष्ट्र शासनाची प्रकाशने मिळण्याची ठिकाणे

- **संचालक**
  शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय,
  महाराष्ट्र राज्य
  (प्रकाशन शाखा) नेताजी सुभाष मार्ग, मुंबई-४०० ००४.
  दूरध्वनी : (०२२) २३६३२६९३ व ३६३०६९५

- **व्यवस्थापक**
  शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार
  फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी. पी. ओ. नजीक,
  पुणे-४११ ००१
  दूरध्वनी : (०२०) २६१२५८०८

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार,
  सिव्हील लाईन्स, नागपूर-४४० ००१
  दूरध्वनी : (०७१२) २५६२६१५

- **सहा. संचालक**
  शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार, पैठण रोड,
  औरंगाबाद-४३१ ००१
  दूरध्वनी : (०२४०) २३३१५२५

- **व्यवस्थापक**
  शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार,
  ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६ ००३
  दूरध्वनी : (०२३१) २६५०४०२

आणि

## महाराष्ट्र शासनाच्या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते